**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....**

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

**शासन निर्णय क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि १**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.

**दिनांक :- १५ जून, २०१३**

**वाचा :-**

१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक १ दिनांक ०४ जानेवारी, २०१३

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ६ दिनांक १९ जानेवारी, २०१३

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक प्राशातु - १११२ / (२५८/२०१२) / प्राशि - ३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३

४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३

५) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५७, ५८ व ५९ दिनांक २० एप्रिल, २०१३

६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र २००९ / (६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२

**प्रस्तावना -**

राज्यातील सर्व शाळांना **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** लागू करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने राज्यामध्ये सर्व नवीन



Scanned by CamScanner

Scanned with OKEN Scanner

खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देताना **हेतुपत्र (Letter of Intent) व शाळा मान्यता प्रमाणपत्र** (Letter Of Approval) ची पध्दती स्वीकारावी असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने CBSE, ICSE इत्यादी बोर्डांच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता शासन निर्णय दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

२. कायम विना अनुदान तत्वावर नवीन खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे यासाठी शासनाने सन २०१३ मध्ये **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** पारित केला असून त्याची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून करण्यात आलेली आहे. या अधिनियमाच्या अनुषंगाने फेब्रुवारी, २०१३ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त ७,१०८ अर्जाची छाननी करुन दिनांक १५ मे, २०१३ रोजी २,४१७ अर्जांना पात्र करण्यात आलेले आहे. या पात्र प्रस्तावावर पुढील कार्यवाही कोणत्या पध्दतीने करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

## शासन निर्णय -

(१) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** अन्वये सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ७१०८ प्रस्तावांपैकी पुढीलप्रमाणे २४१७ प्रस्ताव पात्र म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वर्गीकरण | एकूण प्राप्त प्रस्ताव | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | ६,१२१ | १,९७७ | ४,१४४ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ९८७ | ४४० | ५४७ |
| | एकूण | ७,१०८ | २,४१७ | ४,६९१ |



Scanned with OKEN Scanner

(२) **शाळा दर्जावाढीच्या** ४४० पात्र शाळांना शैक्षणिक वर्ष २०१३-१४ या वर्षापासून वर्ग सुरु करण्याबाबतची **परवानगी** देण्यात येत आहे.

(३) **नवीन शाळांचे प्रस्ताव** - वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या १९७७ नवीन शाळांना याद्वारे परवानगी देण्यात येत आहे. प्रत्येक शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,** २००९ मधील तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उपरोक्त संबधित पात्र ठरलेल्या शाळांच्या व्यवस्थापनांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,** २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन शाळा प्रथम मान्यतेसाठी संबंधित सक्षम अधिका-यांकडे एक महिन्याच्या कालावधीत अर्ज करावेत. संबंधित सक्षम अधिका-यांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,** २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(४) पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता १ली पासून परवानगी देण्यात येईल.

(५) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. या अधिनियमामधील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्याकरीता दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरीता देण्यात आलेली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरीता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.



Scanned with OKEN Scanner

(६) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील त्याचप्रमाणे **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम,** २०१२ यातील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(७) सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय तपशीलानुसार नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य सचिवांकडून संबंधित अर्जदाराला वैयक्तिरित्या कळविणे आवश्यक राहील व त्याची पोच शासन दप्तरी ठेवण्यात यावी.

(८) सोबतच्या विवरपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय DISE Data मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद / क्रमांक घेणे आवश्यक राहील. याबातची पुढील कार्यवाही राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत करण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन / दर्जावाढ प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. 201306151740421921 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रकाश ठुबे)
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

Kuldeep Mac\G.R. Self Finance 11.06.2013

Scanned with OKEN Scanner

| अनु. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थाचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा / दर्जा वाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| ६९८ | पुणे | श्री नरसिंह प्रतिष्ठान ता. इंदापूर जि.पुणे. | श्री नरसिंह इंग्लिश मेडियम स्कुल निमगाव केतकी ता. इंदापूर जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६९९. | पुणे | श्री बिरंगाई शिक्षण संस्था प्रसारक संस्था कळस ता. इंदापूर जि.पुणे. | हरणेश्वर इंग्लिश मेडियम स्कुल कळस ता. इंदापूर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७०० | पुणे | सदाशिव मोहळकर शिक्षण संस्था जंक्शन ता. इंदापूर जि.पुणे. | राजवर्धन इंग्लिश मेडियम स्कुल जंक्शन ता. इंदापूर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७०१ | पुणे | तुळजाभवानी एज्युकेशन सोसा. निमगाव केतकी ता. इंदापुर जि.पुणे. | तुळजाभवानी इंग्लिश मेडियम स्कुल निमगाव केतकी ता. इंदापुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७०२ | पुणे | आनंद शिक्षण संस्था होळ ता. बारामती जि.पुणे. | आनंद प्राथमिक इंग्रजी माध्यमाची शाळा होळ ता. बारामती जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७०३ | पुणे | अनेकान्त एज्यु.सोसा.बारामती ता. बरमती जि.पुणे. | अनेकान्त इ मेडियम स्कुल बारामती ता. बारामती जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७०४ | पुणे | ज्ञानदिप शिक्षणं संस्था सावळ ता. बारामती जि.पुणे. | ज्ञानदिप इंग्लिश मेडियम स्कुल वंजारवाडी ता. बारामती जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७०५ | पुणे | श्री विठ्ठल विद्या प्रसारक मंडळ भिकोबानगर ता. बारामती जि.पुणे. | श्री विठ्ठल विद्या प्रसारक मंडळाची इंग्रजी माध्यम शाळा भिकोबानगर ता. बारामती जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७०६ | पुणे | सद्गुरु वामनराव पै शिक्षण संस्था ता. बारामती जि.पुणे. | अजितदादा इंग्लिश मेडियम स्कुल कटफळ बारामती जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७०७ | पुणे | महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, सदाशिव पेठ, पुणे-३० | म.ए.सो.इंग्लिश मिडीयम स्कूल, हरिकृपानगर, बारामती, ता.बारामती, जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७०८ | पुणे | दिगंबर जैन एज्यु. सोसा. मुरुड ता.जि.लतुर | किंडरलॅन्ड इंग्लिश स्कुल वाघजाईनगर, आंबेगाव,पुणे-४६ | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७०९ | पुणे | जयहिंद एज्युकेशन सोसायटी, वडगांव शेरी, पुणे-१४ | संस्कार पब्लिक स्कूल, स.नं.२९४(२) लोहगांव, ता.हवेली,जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७१० | पुणे | महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी, हुजूरपागा, लक्ष्मी रोड, पुणे-३० | हुजूरपागा इंग्रजी मिडीयम स्कूल, कात्रज, पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |



Scanned with OKEN Scanner